(9)

# विशेष अहवाल
## (Special Report)

प्रति :- मा. पोलीस अधिक्षक, ला प्र वि औरंगाबाद

महितीस्तव :- मा. महासंचालक ला प्र वि म रा मुंबई.

:- मा. सह संचालक स्थानीक निधी लेखा, लेखा कोष भवन औरंगाबाद

:- मा.अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि.औरंगाबाद.

पासुन :- पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.औरंगाबाद.

---

जा. क्र. पोउपअा/लाप्रवि/सापळा/तपास/औ.बाद/2023 - 938 औरंगाबाद, दिनांक 25/02/2023

| | | |
|---|---|---|
| 1 | युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| 2 | तक्रारदाराचे नाव व पत्ता | श्री. कालीदास अजबराव बडे वय 32 व्यवसाय नौकरी बालविकास प्रकल्प अधिकारी एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय घनसांवगी तालुका घनसांवगी जि.जालना |
| 3 | पोलीस ठाणे, गु.र.नं. व कलम | कदीम जालना जि. जालना गु.र.नं. 78/2023 कलम 7 भ्र.प्र.अधि.1988 |
| 4 | आलोसे यांचे नाव, पद, नेमणुकीचे ठिकाण व वर्ग | श्री.मारूती हुल्लाजी पपुलवार, वय 47 वर्षे, व्यवसाय नोकरी, सहाय्यक लेखापरिक्षक अधिकारी स्थानीक निधी लेखा विभाग जालना रा. ऐ-3 बालाजी निवास मोर चौक काब्रानगर नांदेड -वर्ग-2 |
| 5 | घटनेचे ठिकाण | लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद कार्यालय जालना |
| 6 | गुन्हा घडला तारीख वेळ | दिनांक 23/02/2023 चे 17.48 |
| 7 | गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक 24/02/2023 रोजी 02.03 वाजता |
| 8 | आरोपी अटक तारीख व वेळ | दिनांक 24/02/2023 रोजी 02.25 वाजता |
| 9 | लाचेची रक्कम | **35,000/- रुपये** |
| 10 | तपासी अधिकारी | श्री. संदीप राजपुत, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.औरंगाबाद |
| 11 | आलोसे यांचे सक्षम अधिकारी | मा. सह संचालक स्थानीक निधी लेखा, लेखा कोष भवन औरंगाबाद |
| 12 | घरझडती अहवाल | घरझडती घेण्यात आली आहे. |

**खुलासा** :-

सादर विनंती की, यातील मुळ तक्रारदार श्री. कालीदास अजबराव बडे वय 32 व्यवसाय नौकरी बालविकास प्रकल्प अधिकारी एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय घनसांवगी तालुका घनसांवगी जि.जालना मोबाईल नंबर 8262000215 रा शासकिय निवासस्थान पंचायत समिती परिसर पंचायत समिती घनसांवगी ता घनसांवगी जि जालना. यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 23/02/2023 रोजी जिल्हा परिषद कार्यालय जालना येथे लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक श्री.मारूती हुल्लाजी पपुलवार, वय 47 वर्षे, व्यवसाय नोकरी, सहाय्यक लेखापरिक्षक अधिकारी स्थानीक निधी लेखा विभाग जालना रा. ऐ-3 बालाजी निवास मोर चौक काब्रानगर नांदेड यांनी तक्रारदार श्री. कालीदास अजबराव बडे यांच्याकडे पंच साक्षीदारा समक्ष त्यांचे कार्यालयाचे लेखा परिक्षण अहवालातील आक्षेप व वसुली संदर्भातील मुददे निकाली काढणेसाठी त्यांना 35000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम लघु पाटबंधारे विभाग जिल्हा परिषद कार्यालय जालना येथे स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दिनांक 23/02/2023 रोजी लघु पाटबंधारे विभाग जिल्हा परिषद कार्यालय जालना येथे सापळा लावण्यात आला असता श्री पपुलवार यांनी तक्रारदार यांचेकडुन पंचसाक्षीदारा समक्ष 35000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना पकडण्यात आले व लाचेची रक्कम त्यांच्या उजव्त्यांनी घातलेल्या पॅन्टे पाठिमागील डाव्या बाजुच्या खिशातुन हस्तगत करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणात लाचमागणी पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात आला असुन वर नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आलोसे श्री.मारूती हुल्लाजी पपुलवार, वय 47 वर्षे, व्यवसाय नोकरी, सहाय्यक लेखापरिक्षक अधिकारी स्थानीक निधी लेखा विभाग जालना रा. ऐ-3 बालाजी निवास मोरचौक काब्रानगर नांदेड यांना दिनांक 24/02/2023 रोजी 02.25 वाजता अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक श्री.संदीप राजपुत, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद हे करीत आहेत.

सविनय सादर

24.2.23

**( मारूती पंडित )**
पोलीस उप अधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद.